## मी विठ्ठल पाहिला?

### वारी अनुभव - लेख क्र. 17

**- राजश्री कुलकर्णी** (साऊथ ब्रुन्सविक, न्यु जर्सी)

**माळशिरस... पुढे**

संध्याकाळी पाचच्या सुमारास आम्ही माळशिरसला पोहोचलो. चहा घेतला, फ्रेश झाले. आता परत हातांवर लाल गुथी दिसायला लागल्या. पुन्हा पाण्याची ॲलर्जी झाली, की काय? नेहमीसारखी मनापासून प्रार्थना केली, “आता फक्त दोनच दिवस राहिलेत. माऊली कृपया सांभाळून घे. ‘हसत-खेळत, नाचत-बागडत’ परत जाऊ दे.” घसा थोडा खवखवतो आहे, असं वाटलं... सर्दी सुरू होण्याआधी घशामध्ये जसं होतं ना, तसं वाटायला लागलं! सुदैवाने जेवणामधे खिचडी-कढी हे अन्नपदार्थ होते. गरम-गरम कढी प्यायल्यानंतर बरं वाटलं. मात्र एव्हाना या छोट्या-मोठ्या शारीरिक व्याधींचं काहीच वाटेनासं झालं; त्यांच्याकडे त्रयस्थासारखं बघायला शिकले होते. आता फक्त पंढरपूरचे वेध लागले होते.

दिवसभराच्या थकव्यामुळे संध्याकाळी हरिपाठ-अभंग म्हणताना खूप झोप येत होती. रात्री नऊ वाजता एका घरी फक्त झोपण्यापुरते, आमच्या दिंडीमधल्या आम्ही पाच बायका गेलो. अगदी जुन्या दिसणाऱ्या आणि मोडकळीस आलेल्या त्या घराच्या तिसऱ्या मजल्यावरच्या अगदी छोट्याशा खोलीत आमची झोपायची सोय होती. आम्ही पाच जणी वेड्यावाकड्या जशी जागा मिळेल तशा झोपलो. त्या घरामधे क्षमतेपेक्षा खूप जास्त लोकांची रहाण्याची व्यवस्था केली होती. शेवटपर्यंत त्या घराचे मालक कोण होते, हे कोडं सुटलंच नाही.

शनिवार जुलै ५, २०१४: माळशिरस-वेळापूर १७.२ किमी:

**<u>अभिषेक, ‘धावा’ आणि समाजआरती:</u>**

**अभिषेक:** आज 'घड्याळजीं'सोबत तळावर जाऊन, माऊलीच्या पादुकांचा अभिषेक बघायला जायचं ठरलं होतं. सकाळी २ वाजता उठून, तीन वाजेपर्यंत सगळं आवरून मी-चित्रा आणि आशाताई वेळेपूर्वीच तयार झालो. पायाची सूज अजूनही उतरली नव्हती. पण आता त्याचं काहीच वाटत नव्हतं. मुक्कामाहून 'घड्याळजीं'सोबत तळाच्या दिशेने चालायला सुरुवात केली. साधारणत: एक/दोन मैल अंतर असेल. तळावर पोहोचलो तेंव्हा पाच वाजले होते. आधी रांगेत उभे राहून पादुकांचं दर्शन घेतलं. त्यानंतर माऊलीच्या तंबूच्या आंत बसायला २५-३० लोकांना परवानगी मिळाली. एक वारकरी पालखीची जुनी सजावट काढून, नवीन ताज्या फुलांची सजावट करीत होता. सजावट करणारा हा वारकरी अगदी जीव ओतून, मनापासून ते काम करीत होता. सगळी जुनी फुलं त्यानं आधी काढून टाकली. मग पांढऱ्या फुलांच्या माळा लावल्या. त्यावर पिवळ्या झेंडूच्या फुलांच्या माळांनी गोल फेरे बांधले. त्यावर निळी आणि चंदेरी चमकी लपेटली. आणि पालखीची आकर्षक सजावट केली.



त्याच तंबूमधे एका बाजूला माऊलीच्या पादुकांचा अभिषेक आणि पूजा सुरू होती. साडेपाच वाजता एका वारकऱ्याने कर्णा फुंकला. पूजा सुरू होण्यापूर्वी **'कर्णा'** (एक जुनं वाद्य) वाजवण्याची प्रथा आहे. हे वाद्य हाती धरायला दोन व्यक्ती लागतात.



साडेपाच ते सहा वाजेपर्यंत पूजा चालली. आम्हाला पालखीची सजावट आणि माऊलीच्या पादुकांचा अभिषेक अगदी जवळून बघायला मिळाले.

सात वाजता दिंडीसोबत चालायला सुरुवात केली. आज ‘खुडुस’ला गोल रिंगण होतं. मध्यान्हीच्या सुमारास जेवायला थांबलो. आज उन्हामुळे आणि पहाटे खूप लवकर उठल्यामुळे जास्त थकवा जाणवत होता. (खिचडी-ताक-लाडू) कसंबसं जेवले. देशमुख दिंडीचे अध्यक्ष ‘कुलकर्णी’ यांच्याशी भेट झाली. आणि मग तासभर कशी डुलकी लागली, ते कळलंच नाही. त्यानंतर परत दिंडी सोबत चाललो. आणि मग होता, 'धावा'!

**धावा**: हा उतार आहे. 'धावा'बद्दल संत तुकारामांची एक आख्यायिका सांगितली जाते. या ठिकाणी पंढरपूर अगदी जवळ आलं आहे अशी तुकारामांची समजूत झाली आणि विठोबाचं लवकरात लवकर दर्शन व्हावं, या हेतूने ते धावत सुटले. अजूनही वारकरी लोक या ठिकाणी सगळे धावत सुटतात. शेडगे पंच दिंडीच्या वारकरी 'शोभा' धावताना साडी पायात अडकून पडल्या. त्यांच्या मी अगदी मागे होते, त्यांच्या पायात पाय अडकून मीही पडले. मला विशेष लागलं नाही. मात्र शोभाचा गुडघा चांगलाच दुखावला. ते अंतर एक किलोमीटरच्या जवळपास असावं. धावण्याचा बऱ्यापैकी सराव असलेली मी, पण एवढसं अंतरसुद्धा 'न पडता' धावू शकले नाही. परत एकदा 'जमिनीवर' आले.

धावानंतर होतं, ‘भारूड’! परत थोडावेळ थांबलो. एका पुरुषाने गर्भवती बाईचं रूप धारण केलं होतं. त्यानी भारूड म्हणून सगळ्यांना हसवलं, नकला केल्या. लाखो लोक हा कार्यक्रम बघत होते. दूरदर्शनकेंद्राचे लोक कॅमेराने तो संपूर्ण कार्यक्रम टिपत होते. तो कलाकार खरोखरीच प्रतिभावान होता.

**समाजआरती:** त्यानंतर समाजआरतीसाठी तळावर गेलो. इथे कित्येक लाख लोक जमले होते. बायका खाली बसल्या होत्या; मात्र  पुरुष टाळ आणि पखवाज वाजवत तालात नाचत होते. सगळे गट एकाच प्रकारे वाजवीत होते. कितीतरी वेळ हे नृत्य अन् वादन चालू होते. आसमंतात तो आवाज भिनला होता. आणि अचानक् चोपदारांनी हवेत चोप फिरवला. एरवी अक्षरश: जमिनीवर टाचणी पडली तरी आवाज येईल इतकी शांतता पसरली असती, तो अलिखित नियमच होता; परंतु त्या दिवशी मात्र चोपदारांनी हवेत चोप फिरवला, तरी एक गट  वाजवतच राहिला. अध्यक्षांनी त्या वाजवणाऱ्या गटाच्या प्रमुखाला कारण विचारलं, आणि मग त्यांचं वाजवणं थांबलं. कोणत्याही गटामध्ये कोणाला काही समस्या असतील, तर प्रमुखांपर्यंत पोहोचविण्याचा तो एक मार्ग होता. तो सर्व अनुभव विलक्षण होता.

त्यानंतर हरवलेल्या वस्तुंविषयी माहिती दिली. त्या वस्तू कुठे आणि मिळतील, त्याबद्दल अगदी थोडक्यात माहीती सांगितली. मग १० मि. एकत्र आरती झाली.  लाखो लोक, टाळ -पखवाजचा नाद, मग ती निरव शांतता, त्यानंतरची आरती,.... हा सगळा अनुभव शब्दातीत आहे. हे स्वत: अनुभवायला पाहिजे... लिहिताना शब्दांच्या मर्यादा जाणवतात.

परत येताना जाम दमलो  होतो. आमच्या मुक्कामाच्या ठिकाणी आलो, तोपर्यंत अण्णांचं प्रवचन सुरू झालं होतं. "ज्ञानाला भक्तीची जोड पाहिजे" या विषयावर ते बोलले. दुपारचा चहा



झाला. मग भजन झालं, बाहेरच्या  मोकळ्या हवेत! हवा अगदी स्वच्छ होती. मस्त वाटलं. पंढरपूरला पोहोचायला आता फक्त दोन दिवस बाकी होते.

त्यानंतर जेवणं झाली. किचन स्वच्छ झाल्यानंतर आम्ही सगळ्या मुक्कामाच्या ठिकाणी ओट्यावरच झोपलो. बाहेर मोकळ्या अंगणात आकाशाकडे बघत, दिवसभरातील घडलेल्या गोष्टींची मनातल्या मनात उजळणी करीत असताना झोपेच्या अधीन कधी झाले, ते लक्षातच आलं नाही. (**क्रमश:**)